# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/12/2022 (सोमवार) सकाळ

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील ईदर खदान नं ०६ कन्हान येथे दिनांक ११/१२/२०२२ चे १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– महेश वामनजी नासरे, वय ३४ वर्ष, रा. तीनखेडा, ता. नरखेड जि. नागपूर ह. मु cmpdi कॅम्प न्यू सबएरीया ऑफीस कॉलनी नं ०३ कन्हान हे कामठी उपक्षेत्र वेकोली येथे सिक्युरीटी गार्ड म्हणुन नौकरी करत असुन त्यांचे तोंडी रीपोर्ट वरून यातील आरोपी क्र. १) नामे– समीर सदरूल सिद्दीकी, वय ३० वर्ष, रा. अष्टविनायक कॉलनी, टेकाडी कन्हान व आरोपी क्र. २) नामे– राहूल जोसेफ जेकब, वय २६ वर्ष, रा. गिने मोहल्ला कांद्री कन्हान हे बाईक वरून वेकोलि येथील प्रतिबंधीत क्षेत्रात जात असतांना सुरक्षा गार्ड नामे– मिलींद खोब्रागडे याने आरोपीतांना जाण्यास मनाई केल्याचा राग मनात ठेवून त्यास शिवीगाळ करून सुरक्षा गार्डला हातबूक्कीने मारपीट करून सरकारी कामात अडथळा निर्माण करून आरोपीतांनी त्यांच्या कडील असलेल्या देशी माऊजरने जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने गोळया झाडून त्यास गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ३५३, ३०७, ३४ भादंवि. सहकलम ३, २५ भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विलास काळे पोलीस स्टेशन कन्हान मो. नं. ९८६७११२१८५ करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. नरखेड** :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील मौजा राजणी शिवार येथे दिनांक ११/१२/२०२२ चे १२.३० वा. सुमारास यातील नमुद आरोपी नामे– १) संतोष झापुदेव आप्पा, २) मुकेश सुखदेव आप्पा ३) वासुदेव डोपरे तिन्ही रा. मुकणी ता. नरखेड यांनी संगणमत करुन आरोपी क्र १) यांची मुलगी फिर्यादी नामे– आशिष मेघराजजी अढाये, वय ३१ वर्ष, रा. मुकणी डोरली यांचे भावाने पळवुन नेल्याचे कारणा वरुन फिर्यादीचे शेतात जावुन फिर्यादीला उजवे पायाचे पोटरीवर काठीने मारले व फिर्यादी व त्याचे वडील नामे– मेघराजजी अढाये, रा. मुकणी डोरली यांना आरोपीतांनी संगणमत करुन शिवीगाळ करुन जिवे मारण्याची व राहते घर पेटविण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन नरखेड येथे आरोपीतांविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६,३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक ब. नं. ७९३ नंदकिशोर मेश्राम मो. नं. ९८८१९८०५०६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**